Vol II Issue IX

ISSN No : 2230-7850

Monthly Multidiciplinary
Research Journal

Indian Streams Research Journal

Executive Editor

Ashok Yakkaldevi

Editor-in-chief

H.N.Jagtap

Welcome to ISRJ

RNI MAHMUL/2011/38595 **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

International Advisory Board

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [Malaysia]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India
Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net

Indian Streams Research Journal
Volume 2, Issue. 9, Oct 2012
ISSN:-2230-7850

Available on all social networks
citeulike

ORIGINAL ARTICLE

''औरंगाबाद जिल्हयातील प्रमुख पिकांचा भौगोलिक अभ्यास''

सावंत संदीप भानुदासराव , बावने नायबराव सुनिल

भूगोल विभाग
एम.एस.एस.,कॉलेज जालना कॉलेज पैठण ता.जि.जालना औरंगाबाद
भूगोल विभाग श्रीनाथ बी.एड्.ता.पैठण, जि.

सारांश :

औरंगाबाद शहराची स्थापना मलिक अंबर याने इ.स.1610 साली या पूर्वीच्या नावावरून केली या शहराचे नांव फत्तेपुर व औरंगाबाद असे काळाच्या ओघात बदलत गेले. औरंगाबाद जिल्ह्याचे भौगोलिक स्थान 190.53′47′′ उत्तर असुन रेखावृत्तीय विस्तार 75023054′′पूर्व असा आहे.व महाऱाष्ट्र राज्याच्या मध्यस्थानी हा जिल्हा आहे. या जिल्ह्याच्या पूर्वेस जालना, पश्चिमेस नाशिक व अहमदनगर हे जिल्हे आहेत. तर उत्तरेस जळगांव व दक्षिणेस बीड व अहमदनगर जिल्हे आहेत. (2011) औरंगाबाद जिल्ह्याची लोकसंख्या 36,95228 इतकी आहे.

औरंगाबाद जिल्ह्यातील जमीन सर्व साधारण चांगली असून पुरेसा व वेळेवर पाउुस असल्यास उत्पादनाचे प्रमाण चांगले राहते. या जिल्ह्यात खरीप आणि रब्बी अशा दोन्ही हंगामात पीके घेतली जातात. येथील मुख्य पिक गहू, ज्वारी, बाजरी, हरबरा, तूर, कापूस,उस गेल्या काही वर्षापासून संकरीत बियाणंचा आणि रासायनिक खतांचा वापर यामुळे उत्पादनात वाढ दिसून येत आहेत्र

संशोधन अध्ययनाचे महत्व :–

मानवाच्या मुलभूत गरजा असून अन्न, वस़्त्र, निवारा यापैकी अन्न, वस्त्र या दोन गरजा कृषीवर अवलेबून आहेत. भारतातील वाढती लोकसंख्या बघता त्यांच्या उपजीवीकेसाठी भारतात मोठ्या प्रमाणावर खाद्य पिकांची लागवड केली जाते. त्यामुळे व्यापारी पिकांचे प्रमाण भारतात कमी असते. भारतात मात्र तांदूळ, गहू, ज्वारी, बाजरी मका, बार्ली, हरबरा, उस, फळे इतर कडधान्य ही प्रमुख खाद्य पिकांपैकी भात हे महत्वाचे पीक असून यानंतर गहू ही महत्वाचे पीक मानले जाते. भारतात गव्हाला भातापेक्षा कमी व भरडधान्यापेक्षा जास्त पर्जन्य लागतो.

संशोधनाची उद्दिष्टे –

1)औरंगाबाद जिल्ह्यातील विविध पिकांची माहिती मिळविणे.
2)औरंगाबाद जिल्ह्यातील पिक उत्पादनाचा अभ्यास करणे.
3)अभ्यास क्षेत्रातील प्रमुख पिकांचा अभ्यास करणे.
4)अभ्यास क्षेत्रातील भौगोलिक परिस्थितीनुसार पिक लागवडीचा अभ्यास करणे.
5)अभ्यास क्षेत्रातील खाद्य पिकांचा सविस्तर अभ्यास करणे.
6)अभ्यास क्षेत्रातील व्यापारी पिकांचे उत्पादन वाढीसाठी उपाययोजना सुचविणे.

प्रमुख पिकांचे फायदे –

1)वाढत्या लोकसंख्येच्या उपजिविकेसाठी प्रमुख पिके फायदेशिर ठरतात.
2)प्रमुख पिकांमुळे लोकसंखेस आवश्यक असणाऱ्या अन्नधान्याचे नियोजन करता येते.
3)प्रमुख पिकांच्या वाढीमुळे जास्तीत जास्त जमीन पिकांखाली आणता येते.
4)प्रमुख पिकांच्या वाढीमुळे कृषीचा विकास झापाट्याने होतो.
5)प्रमुख पिकांमुळे जलसिंचनाचा / पाण्याचा योग्य तो वापर करता येतो.
6)प्रमुख पिकांमुळे दर हेक्टरी उत्पादन वाढण्यास मदत होते.

प्रमुख पिकांचे तोटे –

1)प्रमुख पिकांमुळे खाद्य पिकांचेच उत्पादन वाढते.
2)व्यापारी पिकांचे उत्पादन खूप कमी प्रमाणात घेतले जाते.
3)पाण्याची कमतरता असल्यास उत्पादन घटते.

Please cite this Article as : *सावंत संदीप भानुदासराव , बावने नायबराव सुनिल, ''औरंगाबाद जिल्हयातील प्रमुख पिकांचा भौगोलिक अभ्यास''* **:**
Indian Streams Research Journal (Oct. ; 2012)

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा –

सदर शोध निबंध हा भारतातील महाराष्ट्र राज्यातील औरंगाबाद जिल्हयाचा असून औरंगाबाद जिल्हयातील 8 तालूक्यातील सर्वेक्षण करुन औरंगाबाद जिल्हयातील प्रमुख पिकांखालील क्षेत्र, उत्पादन व दर हेक्टरी उत्पादनापूरते मर्यादित असून त्यासाठी 1995 ते 2001 वर्षाच्या कालावधीची संशोधनासाठी निवड केली आहे.

संशोधनाचे अभ्यास क्षेत्र –

प्रस्तुत शोधनिबंधासाठी महाराष्ट्रातील औरंगाबाद जिल्हयाची निवड करण्यात आली आहे. औरंगाबाद हे एक ऐतिहासिक शहर असून मराठवाड्याची राजधानी आहे. त्याला 52 दरवाजे असून अजिंठा व वेरुळ हि जगप्रसिध्द पर्यटन स्थळे असल्यामुळे जागतीक पातळीवर औरंगाबाद शहराचे नांव झाले आहे. औरंगाबाद हा जिल्हा महाराष्ट्र राज्यात सर्वसाधारणपणे मध्य भागात असून औरंगाबाद जिल्हयात एकुण 09 तालुके आहेत औरंगाबादचे भौगोलिक स्थान 190.53'47'' उत्तर 75023054''पूर्व आहे. (इ.स.2005 साली) 9 वा तालुका फुलंब्री अस्तित्वात आला. औरंगाबाद जिल्हयाची क्षेत्रफळ 10100 चौ.कि.मी. आहे व लोकसंख्या 36,95,918 इतकी आहे.

जिल्हयाचा उत्तर भागात सातमाळा डोंगररांगा व अजिंठा डोंगररांगा पूर्व–पश्चिम पसरल्या आहेत. जिल्हयाच्या दक्षिण भागात सातारा डोंगर तर पूर्व भागात पसरले आहेत जिल्हयाच्या मध्यवर्ती भागात वेरुळच्या टेकड्या असून दक्षिण भागात गोदावरीचे मैदान आहे. औरंगाबाद जिल्हयाचा पूर्वभागात डोंगराळ प्रदेशामुळे पावसाचे प्रमाण जास्त असून पश्चिमेकडे पावसाचे प्रमाण कमी–कमी होत जाते. जिल्हयातील उत्तरेकडील जमीन हलकी व मूरमाड असून दक्षिणेकडी गोदावरी काठची जमीन काळी कसदार सुपीक आहे. कापूस व उस यांसारखी व्यापारी पिके येथे घेतली जातात.

शेती व्यवसाय–

औरंगाबाद जिल्हयाचे हवामान उष्ण व कोरडे असून खरीप हंगामात बाजरी पिक जिल्हयाच्या सर्वच भागात घेतले जात असल्यामुळे याला जिल्हयातील प्रमुख पिक म्हणतात. तसेच मका, ज्वारी आणि हरभरा ही पिके घेतात उसाचे उत्पादन फुलंब्री तालुक्यात जास्त होते. अलीकडे औरंगाबाद जिल्हयातील फलोत्पादन क्षेत्रात वाढ होत आहे. फुलंब्रीचे आंबे, द्राक्ष प्रसिध्दीस येत आहेत. तसेच दौलताबादचे सिताफळ पेरु, अंजीर प्रसिध्द आहेत.

संस्कृतीचे महत्व –

औरंगाबादेतील पैठण येथील पैठणी साडी व हिमरुशाली ही प्रसिध्द आहे. तसेच प्राचीन पारंपारीक कलेचा वारसा जपणारा जिल्हा आहे. जिल्हयात संगीत, शिल्पकला, चित्रकला इत्यादी कला जगप्रसिध्द आहे.

संशोधन पध्दती :

सदर प्रस्तुत निबंधासाठी संशोधनातील सर्वेक्षण संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आला असून संशोधनाच्या साधनांमध्ये (दुयम स्त्रोत) प्रकाशित माहीती व अप्रकाशित साहित्यात औरंगाबाद जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन 1995 पासून 2008 पर्यंतच्या प्रकाशित साहित्याचा वापर करण्यात आला आहे.

संशोधनाची अभ्यास पध्दती –

प्रस्तुत श्शोधनिबंधात औरंगाबाद जिल्हयातील 1995 ते 2008 पर्यंतच्या कालावधीतील प्रमुख पिकांचे क्षेत्र, प्रमुख पिकांचे उत्पादन. यावरुन दर हेक्टरी उत्पादन काढण्यासाठी पुढील सत्रांचा वापर करण्यात आला आहे.

प्रमुख पिकांचे एकुण उत्पादन

सुत्र :– दर हेक्टरी उत्पादन

प्रमुख पिकाखालील एकुण क्षेत्र

विषय विवेचन :–

महाराष्ट्र राज्यातील औरंगाबाद जिल्हयातील प्रमुख पिकाखालील क्षेत्राचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, बऱ्याच पिकाखालील क्षेत्रात वाढ झोलेली आहे. तर काही पिकाखालील क्षेत्रात घट झाल्याचेही दिसून येते. ज्वारी, मका, कापूस, हरभरा, या पिकांच्या क्षेत्रात वाढ होत आहे. तर तांदूळ, गहू, बाजरी, उस, भूईमूग कडधान्य या सारख्या पिकांच्या क्षेत्रात घट (कमी) होत आहे. यावरून असे समजते की व्यापारी पिकांच्या क्षेत्रात वाढ होत असून अन्न धान्याच्या पिकाखालील क्षेत्रात घट होत आहे.

कोष्टक क. 1
औरंगाबाद जिल्हयातील प्रमुख पिकाखालील क्षेत्र दर्शविणारे कोष्टक (दर हेक्टरी)

अ. क.	पिके	1995–96	1997–98	1998–99	1999–2000	2000–01
1	तांदूळ	1248	1446	1502	1300	485
2	गहू	40175	37056	37719	51500	29549
3	ज्वारी	234971	256891	234151	212100	238824
4	बाजरी	1090706	174958	148409	13300	137371
5	मका	14072	40794	42195	45400	77869
6	उस	21532	19141	12495	18500	11314
7	कापूस	74666	107457	162630	15600	141296
8	भूईमूग	15058	14454	13875	13600	5915
9	हरभरा	34401	38307	41306	48500	41548
10	एकुण कडधान्य	10154	125029	106623	133900	104481
	एकुण	728373	815533	800925	803800	788652

(संदर्भ– औरंगाबादचे आर्थिक, सामाजिक, समालोचन पाहणी – 2000–01)

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, औरंगाबाद जिल्हयातील प्रमुख पिकाखालील क्षेत्र 1995–96 मध्ये 728373 दर हेक्टरी इतके होते. 1996–97 मध्ये 815533 दर हेक्टरी क्षेत्र पिकाखालील होते. परंतू नंतर मात्र प्रमुख पिकाखालील क्षेत्र काही टप्यात सम प्रमाणात व नंतर 2000–01 मध्ये 788652 दर हेक्टरी प्रमुख पिकाखालील क्षेत्रात घट झालेली दिसून येते.

ज्वारी, मका, कापूस, हरभरा, एकुण कडधान्य पिकाखालील क्षेत्रात सातत्याने वाढ झाल्याचे दिसून येते तर तांदूळ, गहू, बाजरी, उस, भुईमूग या पिकाखालील क्षेत्र सातत्याने कमी होत आहे. ज्यारी या पिकाखालील क्षेत्रात सर्वात जास्त वाढ झाल्याचे दिसून येते 1995–96 मध्ये 234971 दर हेक्टरी होते. तर 2000–01 मध्ये 2638824 दर हेक्टरी इतके झाले. तर तांदूळ या पिकाखालील क्षेत्रात सर्वात जास्त घट झाल्याचे दिसून येते. 1995–96 मध्ये तांदूळ पिकाखालील क्षेत्र 1248 दर हेक्टरी होते. तर 2000–01 मध्ये ते 485 दर हेक्टरी इतके आढळून आले.

औरंगाबाद जिल्हयातील प्रमुख पिकाचे उत्पादन :–

महाराष्ट्रातील औरंगाबाद जिल्हयातील प्रमुख पिकांच्या अभ्यासावरून असे दिसून येते की, 1995–96 ते 2000–01 पर्यंत उत्पादनात सातत्याने वाढ व घट झाल्याचे दिसून येते 1995–96 मध्ये सर्व प्रमुख पिकांचे उत्पादन दर हेक्टरी उत्पादन किलोमध्ये 72529 इतके होते ते 1997–98 मध्ये 72947 दर हेक्टरी उत्पादन किलोमध्ये वाढत जावून परत 1998–99 मध्ये 9731 पर्यंत दर हेक्टरी उत्पादन किलोमध्ये घटत असते व 1999–2000 मध्ये दर हेक्टरी उत्पादन किलामध्ये वाढून 13098 इतके झाले व नंतर 2000–01 मध्ये दर हेक्टरी उत्पादन किलोमध्ये 3891 इतकेच शिल्लक राहीले. यावरून असे म्हणता येते की, औरंगाबाद जिल्हयातील पिकांच्या एकुण उत्पादनात काही टप्प्यात वाढ तर काही टप्प्यात घट झाल्याचे दिसून येत आहे.

कोष्टक क. 2
औरंगाबाद जिल्हयातील प्रमुख पिकांचे उत्पादन दर्शविणारे कोष्टक (दर हेक्टरी उत्पादन किलो मध्ये)

अ. क.	पिके	1995–96	1997–98	1998–99	1999–2000	2000–01
1	तांदूळ	417	1182	333	513	667
2	गहू	1049	906	1283	1654	...
3	ज्वारी	606	608	1330	2214	616
4	बाजरी	610	791	856	1142	746
5	मका	1502	1031	2101	4650	954
6	उस	66841	66620	50000	61000	70000
7	कापूस	114	587	145	219	71
8	भूईमूग	664	604	494	594	....
9	हरभरा	406	355	407	729	461
10	एकुण कडधान्य	320	263	2732	1322	306
	एकुण	72529	72347	9731	13098	3891

मुख्य पिकाचे एकुण उत्पादन 00 मे टनात

अ. क.	पिके	1995–96	1997–98	1998–99	1999–2000	2000–01
1	तांदूळ	0.33	0.8	0.22	0.39	1.37
2	गहू	0.026	0.02	0.03	0.03	...
3	ज्वारी	0.00	0.00	0.00	0.01	0.00
4	बाजरी	0.00	0.00	0.00	0.00	0.00
5	मका	0.10	0.02	0.04	0.10	0.01
6	उस	3.10	3.4	4.00	3.29	6.19
7	कापूस	0.00	0.00	0.00	0.00	0.00
8	भूईमूग	0.04	0.04	0.03	0.00	0.01
9	हरभरा	0.01	0.02	0.00	0.01	0.00
10	एकुण कडधान्य	0.00	0.00	0.02	0.00	0.00
	एकुण	0.10		0.01	0.01	

(संदर्भ– औरंगाबादचे आर्थिक, सामाजिक, समालोचन पाहणी – 2000–01)

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, 1995–96 मध्ये एकुण उत्पादन 27139 होते ते 1997–98 मध्ये 71175 ''00'' मे टनात वाढले असून नंतर 1998–99 मध्ये परत कमी झाले ते 10422 ''00'' टनात व परत वाढत जावून 1999–2000 व 2001–01 मध्ये 15998 व 17855 ''00'' मे टनात वाढतांना दिसून आले.

निष्कर्ष व शिफारशी :–

प्रस्तुत संशोधनाच्या अभ्यासावरून काही निष्कर्ष पुढे आलेले आहेत व त्यांना अनुसरून काही शिफारशी खाली देण्यात आल्या आहेत.

1)औरंगाबाद जिल्हयातील प्रमुख पिकाखाली क्षेत्रात 1995–96 पर्यंत घट होतांना दिसून येत होती व नंतर मात्र प्रमुख पिकाखालील क्षेत्रात वाढ होतांना दिसून आली.
2)ज्वारी, मका, कापूस, हरभरा, कडधान्ये या पिकाखालील क्षेत्र सातत्याने वाढतांना दिसून येत होती व नंतर मात्र प्रमुख पिकाखालील क्षेत्रात वाढ होतांना दिसून आली.
3)सर्वात जास्त ज्वारीच्या पिकाखालील क्षेत्रात वाढ झालेली आहे तर तांदूळ या पिकाखालील क्षेत्रात घट झालेली आहे.
4)औरंगाबादेतील 1995–96 ते 2000–01 पर्यंतच्या कालखंडात प्रमुख पिकांचे दर हेक्टरी उत्पादनात घट झाल्याचे दिसून येते.
5)औरंगाबादेतील तांदूळ, गहू, ज्वारी, बाजरी, हरभरा या पिकांच्या दर हेक्टरी उत्पादनात सातत्याने वाढ होतांना दिसून येते परंतू मका, उस, कापूस, भूईमूग, एकुण कडधान्ये या पिकांच्या दर हेक्टरी उत्पादनात सातत्याने घट होत आहे.
6)औरंगाबादेतील तांदूळ, गहू, ज्वारी, बाजरी या पिकांच्या दर हेक्टरी उत्पादनाती वाढ ही उल्लेखनीय आहे.
7)औरंगाबादेतील वाढत जाणारे व दर हेक्टरी उत्पादन हे जरी वाढत असले तरी त्यात अजूनही उत्पादन व दर हेक्टरी वाढवण्यास वाव आहे.

उपाय :–

मराठवाडा हा दुष्काळी भाग असल्यामुळे औरंगाबाद जिल्ह्यातील कृषी ही पूर्णपणे मौसमी पर्जन्यावर अवलंबून असल्यामुळे दर हेक्टरी उत्पादन कमी आहे. दर हेक्टरी उत्पादन जर वाढवायचे असेल तर जलसिंचन , सुधारित बियाणे, खते किटकनाशके वित्तपुरवठा शेतीतील आधुनिक तंत्रज्ञान, शेतकऱ्यांना योग्य ते प्रशिक्षण निर्यातीची योग्य सुविधा या सर्व सुख, सोयी जर शेतकऱ्यांना देण्यात आल्या तर दर हेक्टरी उत्पादन झपाट्याने वाढेल.

जलसिंचनामुळे औरंगाबादेतील फलोत्पादनाची वाढ ही मंद गतीने होत आहे. त्यासाठीही उपाय–योजना आखल्या गेल्या पाहिजे अन्नधान्याच्या उत्पादनात वाढ होत असून त्यामानाने व्यापारी पिकात घट होत आहे हे आर्थिक बाबतीत चिंताजनक बाब दिसून येत आहे. यामुळे शेतकरी आहे त्याच स्थितीत राहून ते नेहमी दारिद्र्यात अडकून पडून कर्ज बाजारी होण्याची दाट शक्यता आहे.

यासाठी कोणत्याही एका पिकाचे उत्पादन वाढवून चालणार नाही तर अन्नधान्य व व्यापारी पिकांचे उत्पादन गरज पडल्यास सम प्रमाणात घेतले जाणे अत्यंत आवश्यक आहे.

संदर्भ :–

1)मजिद हुसेन (2004), सिस्टमॅटिक ॲग्रीकल्चर डिउलोग्राफी, रावत पब्लीकेशन, जयपुर.
2)डॉ. सुरेश फुले (2000), कृषि भूगोल, विद्याभारती प्रकाशन, लातूर
3)सामाजिक व आर्थिक समालोचन, औरंगाबाद जिल्हा
4)जिल्हा कृषि कार्यालय, औरंगाबाद
5)औरंगाबाद जिल्हा गॅझेटिअर
6)भूमी अभिलेखन कार्यालय, औरंगाबाद
7)District Census handbook
8)www.google.co.in
9)www.google.co.in
10)Critical study of Agricultural Production and productivity in Aurangabad district- Dr.Chaudhri Dnyaneshwar-2009

Publish Research Article
International Level Multidisciplinary Research Journal
For All Subjects

Dear Sir/Mam,
We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

Associated and Indexed,India

* International Scientific Journal Consortium Scientific
* OPEN J-GATE

Associated and Indexed,USA

* Google Scholar
* EBSCO
* DOAJ
* Index Copernicus
* Publication Index
* Academic Journal Database
* Contemporary Research Index
* Academic Paper Databse
* Digital Journals Database
* Current Index to Scholarly Journals
* Elite Scientific Journal Archive
* Directory Of Academic Resources
* Scholar Journal Index
* Recent Science Index
* Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net